१

**सफाई कामगार या पदावरून आरोग्य निरिक्षकाच्या पदावर पदोन्नती मिळण्याबाबत.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**
शासकीय परिवहन सेवा इमारत
३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग,
वरळी, मुंबई : ४०००३०.
क्र.नपप्रसं/सफाई कर्मचारी आयोग बैठक/प्र.क्र.५०-२०१७/कार्या-६ /4256
**दिनांक : ३१-१०-२०१८**

31 OCT 2018

## : परिपत्रक :

सदर विषयांकित प्रकरणी नगरपरिषदेकडून, विविध संघटनेकडून व कर्मचाऱ्यांकडून सफाई कामगार या पदावरून आरोग्य निरिक्षकाच्या पदावर पदोन्नती मिळण्याबाबतचा प्रस्ताव या संचालनालयास प्राप्त होत आहेत.

**०१.** नगर विकास विभागाकडून दि.०७-०३-२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्वच्छता निरीक्षक या पदाचा समावेश राज्यस्तरीय संवर्गामध्ये करण्याकरीता मान्यता देण्यात आली आहे.

**०२.** उपरोक्तप्रमाणे आरोग्य निरिक्षक या संवर्गास मान्यता मिळालेली असल्याने या सेवेसाठीचे सेवा शर्ती नियम शासनाने तयार करून त्यांना अधिनियमाचे कलम ३२० च्या तरतुदीनुसार पूर्व प्रसिध्द देऊन अंतिम करणे आवश्यक असल्याने तसेच या नियमात समावेशन, नेमणुका व सेवेच्या शर्ती याबाबत तरतुदी करणे आवश्यक असल्याने या संचालनालयाने त्यानुसार शासनास प्रस्ताव सादर केला आहे.

**०३.** तसेच त्याअनुषंगाने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती औद्योगिक अधिनियम १९६५ चे कलम ७५ (अ) नुसार महाराष्ट्र नगरपरिषद स्वच्छता निरीक्षक राज्यसेवेसाठी आवश्यक अधिसूचना तसेच शासन निर्णय निर्गमित होणेस दि.०९-०५-२०१८ रोजीच्या प्रस्तावान्वये या संचालनालयामार्फत शासनास विनंती करण्यात आलेली आहे.

**०४.** उपरोक्त प्रस्तावांना मान्यता मिळाल्यानंतर " स्वच्छता निरीक्षक " या संवर्गाबाबत योग्य ती नियमोचित कार्यवाही करण्यात येईल. सबब सद्यास्थितीत नगरपरिषद स्तरावर सफाई कामगार / अन्य पदावरून आरोग्य निरिक्षकाच्या पदावर पदोन्नती देता येणार नाही, तरी तशी पदोन्नती देण्यात येऊ नये.

**मा.आयुक्त तथा संचालक (नपप्रसं) यांचे निर्देशानुसार.**

(दगा मोरे)
उप संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई

**प्रति:-** १) मुख्याधिकारी, सर्व.
२) निवड नस्ती.